शनिवार, दि. १७ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### आ. लोणीकर यांच्यावतीने आमदार कुचे यांचा सत्कार; कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

## आमदार कुचे यांच्या जिल्हाध्यक्षपदाच्या कार्यकाळात भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय मिळेल

### आमदार लोणीकरांनी व्यक्त केली अपेक्षा

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी आमदार नारायण कुचे यांची निवड झाली असून यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात भारतीय जनता पार्टीमध्ये माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या गटाने वर्चस्व प्रस्थापित केले असल्याचे मानले जाते. अध्यक्षपदाच्या निवडीत आमदार बबनराव लोणीकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. आमदार नारायण कुचे यांच्या या निवडीचा उत्साह लोणीकर यांच्या निवासस्थानी आयोजित सत्कार समारंभात दिसून आला, जिथे लोणीकर समर्थकांनी कुचे यांचे जोरदार स्वागत केले.

भारतीय जनता पक्षाच्या जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर पक्षश्रेष्ठींची भेट घेऊन आमदार नारायणराव कुचे यांनी थेट आमदार बबनराव लोणीकर यांचे निवासस्थान गाठले. प्रत्यक्ष भेटीदरम्यान अगोदर आमदार बबनराव लोणीकर यचे स्वागत केले व आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने स्वागत स्वीकारताना लोणीकर साहेब तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा शब्दात आमदार नारायण कुचे यांनी सत्काराला उत्तर दिले. यावेळी आमदार बबनराव लोणीकर आणि आमदार नारायण कुचे यांची बंद दाराआड चर्चा देखील झाली.

भाजपाने मध्यप्रदेश पॅटर्ननुसार कोअर कमिटीच्या शिफारशींद्वारे ही निवड केली. एकूण २६ शिफारशींपैकी १४ कुचे यांच्या बाजूने, तर ११ दानवे गटाचे उमेदवार बद्री पठाडे आणि आशाताई माळी यांच्या बाजूने होत्या. लोणीकर यांनी चाणक्य नीतीचा वापर करत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या कुचे यांना पाठबळ देत त्यांना न्याय मिळवून दिला होता. या निवडीमुळे आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत सत्ता मिळेल अशी प्रतिक्रिया आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

आमदार लोणीकर यांच्या निवासस्थानी आयोजित सत्कार समारंभात कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसून आला तर यामुळे



जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या राजकारणाला नवी दिशा मिळणार असल्याचे दिसून आले. मागील काळात माजी खासदार यांनी प्रदेशाध्यक्ष असल्यामुळे कार्यकारणी करताना वनसाईड केले होते, त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मनात अपमानाची सल होती परंतु भाजपाचे कार्यकर्ते शिस्तीचे कार्यकर्ते असल्याने कुठलाही पक्षशिस्त मोडली नाही. आमदार नारायण कुचे यांच्या जिल्हाध्यक्ष पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य आणि निष्ठावंत भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्याला नक्की न्याय मिळेल अशी अपेक्षा आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली.

या सत्कार सोहळ्या प्रसंगी बाबाजी शिंदे, अनीलराव कोलते, गणेशराव खवणे, रमेश महाराज वाघ, कैलासराव बोराडे, विकास पालवे, बंडू खरात, अंकुशराव बोबडे, सुजित जोगस, संभाजी वारे, विजय पवार, कोमल कुचेरिया गणेश मोरे संजय चव्हाण जालिंदर राठोड सागर बर्दापूरकर गजानन शिंदे कमलताई तुल्ले जवाहर तूल्ले स्विटी दायमा ममता सूर्यवंशी, शालिनी मुळे, भास्कर पांढरे अर्जुन माळवदे सदाशिव यादव संदीप काळे जयराम मिसाळ अमोल काळे शुभम जयस्वाल राहुल पळसपगार आकाश हंडे पंकज कुलकर्णी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## राज्यातील १४ पोलीस अधीक्षकांना पदोन्नती

**मुंबई -** राज्यातील १४ पोलीस अधीक्षकांना बदलीपर बढती देण्यात आली असून उप महानिरीक्षक पदावर त्यांची पदोन्नती करण्यात आली आहे. त्यानुसार, नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांना अपर पोलीस आयुक्त मध्य प्रादेशिक विभाग मुंबई या ठिकाणी झाली नियुक्ती देण्यात आली आहे. तर, पुणे ग्रामीणच्या पंकज देशमुख यांना पुणे शहर अपल पोलीस आयुक्तपदी बढती देण्यात आली आहे. आयपीएस मोक्षदा पाटील यांना राज्य राखीव पोलीस बल गटाच्या समादेशक पदावरुन पोलीस उपमहानिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. रत्नागिरीचे पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांना मुंबईच्या अपर पोलीस आयुक्त विशेष शाखा पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

पोलीस उप महानिरीक्षक श्रेणीत पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोलीस अधीक्षक श्रेणीतील निवडसूची-२०२५ मध्ये समाविष्ट, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद भा.पो.से. अधिकारी यांची, स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावरुन, स्तंभ (४) मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मधील तरतुदींनुसार, याद्वारे, पदस्थापना करण्यात येत आहे, असे म्हणत आयपीएस अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. शासनाचे सचिव व्यंकटेश भट यांच्या सहीने ह्या पदोन्नती बदल्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान, यासंदर्भातील शासन आदेश, आस्थापना मंडळ क्र.१ च्या शिफारशींचा यथायोग्य विचार करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला आहे.

प्रसाद अक्कानवरु, पंकज देशमुख, अमोघ गावकर, जी. श्रीधर, मोक्षदा पाटील, राकेस कलासागर, प्रियंका नारनवरे, अरविंद साळवे, सुरेश कुमार मेंगडे, धनंजय कुलकर्णी, विजय मगर, राजेश बनसोडे, विक्रम देशमाने, राजेंद्र दाभाडे या १४ आयपीएस अधिकारी व पोलीस अधीक्षकांना पदोन्नती देण्यात आली आहे.

युवा आदर्श

### ब्रह्मास्मि ...

आधी केवढी मस्ती
बोलले अहं ब्रह्मास्मि
वारस वारसा सत्तेचा
पिढ्या पिढ्या स्वामी
सत्तांतर पसंत नसते
इच्छा फक्त उर्ध्वगामी
जनसेवा विसरुन गेले
कार्य मात्र अधोगामी
बुरशी बसते परंपरेची
म्हणती असे पुरोगामी
दूर दृष्टी ती दृष्टवलेली
दिसेना संकटे आगामी
विसरू गेले सत्य खरे
सेवक असतो हंगामी
कायमचे वर्चस्व असो
का सत्ता वाटते इनामी
वांदांगाच्या वणव्यात
इस्टेट होणारं बेनामी
मागे लागे आरोप कैक
पाचवीला पूजे बदनामी
निरांकुश वृत्ती भोवली
वाटचाल ती बे लगामी
कधी न राही मुक्कामी
खुर्ची भलतीचं हरामी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## भाजपाच्या वतीने तिरंगा पदयात्रेचे आयोजन

### सहभागी होण्याचे भास्कर दानवे यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** ऑपरेशन सिंदूर राबविणाऱ्या भारतीय सैन्य दलाला समर्थन देण्यासाठी देशाच्या सीमांवर भारतीय सैनिकांनी दाखवलेला पराक्रम, त्याग व शौर्य यांचा सन्मान व मनोधैर्य वाढविण्यासाठी दिनांक १८ मे २०२५ रोजी सकाळी ९.00 वाजता भव्य तिरंगा रॅली पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.



हि तिरंगा पदयात्रा जनार्धन मामा चौक जालना येथून सुरु होऊन स्वातंत्र्यवीर सावरकर चौक-टांगा स्टॅण्ड ते बडी सडक येथील श्री राम मंदिराजवळ समारोप होणार आहे. यावेळी भाजपा नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, जालना ग्रा.जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, पहलगाममध्ये निष्पाप नागरिकांवर आणि बहिणी-मुलींवर झालेल्या **पान ३ वर**

### शंखनाद महोत्सवाच्या निमित्ताने गोव्यात भव्य वाहन फेरी

## वाहनफेरी म्हणजे भक्तीची दिव्य वारी - अभय वर्तक

**फोंडा (गोवा) -** उद्यापासून फोंडा, गोवा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणार्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या जनजागृतीसाठी आज एक ऐतिहासिक आणि भव्य वाहनफेरी काढण्यात आली. ही वाहनफेरी फोंडा येथील सनातन आश्रमापासून फर्मागुडीपर्यंत निघाली, तर दुसरीकडे देशाच्या कानाकोपर्यातून महोत्सवासाठी येणारी शेकडो वाहने पत्रादेवी, काणकोण इत्यादी सीमारेषांद्वारे गोव्यात प्रवेश करून सुसज्ज फेरीचा भाग बनली. दुचाकी, चारचाकी आणि बस गाड्यांवर फडकणारे भगवे ध्वज, तसेच मुखात




घुमणारे 'हर हर महादेव', 'सनातन धर्माचा विजय असो', 'जयतु जयतु हिंदुराष्ट्रम्' अशा घोषणांनी संपूर्ण गोवा भगवेमय झाला! या तेजस्वी जयघोषांनी केवळ रस्तेच नव्हे, तर जनमानसही भारले गेले. सर्वत्र एकच स्फुरण निर्माण झाला 'सनातन राष्ट्राचा **पान ३ वर**

## अवकाळी पाऊस, महिला अत्त्याचार, पाणी टंचाई विषयांचा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतला आढावा


**जालना । प्रतिनिधी -** विधान परिषदेच्या उपसभापती श्रीमती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज येथील शासकीय विश्रागृहात आयोजित आढावा बैठकीत जालना जिल्ह्यातील विविध विषयांचा आढावा घेवून प्रशासनाला महत्त्वाचे निर्देश दिले.



उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अवकाळी पाऊस, महिला अत्याचार, पाणी टंचाई व ऊसतोड आणि घरकाम कामगार आदी विषयांचा संबंधीत विभाग प्रमुखांकडून आढावा घेतला. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्र. पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, जिपचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, महिला बालविकास अधिकारी कोमल कोरे, सार्वजनीक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती पवार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री. कापसे आदींची उपस्थिती होती.

ऊसतोड कामगार महिलांसाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतांना श्रीमती डॉ गोऱ्हे म्हणाल्या की, ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य विषयक सर्वेक्षणाची आवश्यकता असल्याचे सांगितले. नोंदणी झालेल्या ऊसतोड कामगारांना नोंदणी कार्डचे वितरण करावेत. तसेच शासनाच्या योजनेचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यातील घरकाम करणाऱ्या कामगारांचे सर्वेक्षण करुन त्यांची माहिती संकलीत करावी. केवळ मुलींची माता असल्याने नाकारण्यात येणाऱ्या मातांना मदत करण्याचा प्रयत्न करावा. जिल्ह्यात बालविवाहाच्या बाबतील चांगले काम झाले आहे. परंतू हे प्रमाण कमी करण्यासाठी गावपातळीवर जनजागृती होणे आवश्यक आहे. जिल्हा प्रशासनाने समाजसेवी संस्थांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तसेच पॉक्सो कायद्यांतर्गत येणाऱ्या प्रकरणांतील पीडित मुलींना महिला विषयक योजनांची माहिती मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच या मुलींचे पुनर्वसन व सशक्तीकरणांवर भर देण्यात यावा. पोलीस विभागाने तयार केलेल्या मुलांसाठी जागरुकता पुस्तीकांचे समाज माध्यम आणि बचत गटांमार्फत जनजागृती करावी. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना अंतर्गत महिलांचे ग्रुप तयार करुन त्यांच्यामार्फत महिलां विषयक कायद्यांचा प्रसार करावा. जिल्ह्यातील बेपत्ता मुलींबाबत तपास वेगाने पूर्ण करावा. तसेच अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले. जिल्ह्यातील रिक्त पोलीस पाटलांची पदे भरण्याची कार्यवाही लवकरात लवकर **पान ३ वर**

## छत्रपती संभाजी राजे विद्यालयात पियुष राठोड ९३% गुण घेऊन प्रथम



**मंठा । प्रतिनिधी -** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता दहावीच्या निकालामध्ये अशोक भाऊ चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मंठा संचलित अशोका पब्लिक स्कूल हेलस व छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेचा निकाल सालाबादप्रमाणे चांगला लागलेला आहे.

छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी विद्यार्थी पियुष सुनील राठोड ९३ टक्के गुण मिळवून विद्यालयातून सर्वप्रथम आला आहे. तर द्वितीय टक्के ७७.४ टक्के गुण मिळवून काना संतोष काष्टे सर्व द्वितीय आला आहे. तर अशोका पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये सचिन अनिल आढे ७९. ७०% गुण मिळवून तालुक्यातून इंग्रजी माध्यमामधून प्रथम आला आहे. सर्वप्रथम तर द्वितीय मंतशा फातिमा इर्शाद खान पठाण ही द्वितीय आली आहे.

सर्व उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुधाकर चव्हाण ,संचालक संजयकुमार चव्हाण, मुख्याध्यापक इर्शाद खान पठाण, रेखा चिंचोले प्राध्यापक दिनेश सेजूळ, अनिल निर्वळ आदींनी अभिनंदन केले आहे.

यावर्षी अकरावीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना ज्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा आहे त्यांना ऑनलाईन प्रवेश करणे गरजेचे आहे अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक इशाद खान पठाण यांनी दिली.

## संपादकीय

# कृतघ्न तुर्की

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड हल्ला करून २६ निष्पाप पर्यटकांना ठार केले. या भ्याड हल्ल्याने भारतात संतापाची लाट उसळली. या हल्याचा जगभर निषेध केला गेला. भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिन्दुर मोहीम राबवून पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे अड्डे नष्ट केले. ऑपरेशन सिन्दुर मोहिमेत भारतीय सैन्यदलाने शंभरहून अधिक जहाल दहशतवाद्यांना यमसदनी पाठवून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवताना फक्त दहशतवाद्यांना टार्गेट केले. भारताने पाकिस्तानी नागरिक किंवा सैन्यदलाला इजा पोहचवली नाही असे असतानाही पाकिस्तानने भारताच्या नागरी वस्तीवर आणि भारतीय सैन्यदलावर ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला अर्थात भारतीय सैन्यदलाने हा हल्ला परतावून लावतानाच थेट पाकिस्तानात घुसून पाकिस्तानचे हवाई अड्डे नष्ट केले. भारत पाकिस्तान दरम्यान सुरू झालेल्या या युद्धात कारण नसताना तुर्की आणि अझरबैजान या दोन देशांनी पाकिस्तानची बाजू उचलून धरली इतकेच नाही तर तूर्कीने थेट पाकिस्तानला लष्करी मदत करत पाकिस्तानला ड्रोन आणि इतर लष्करी साहित्य पुरवले. पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्यासाठी जे ड्रोन पाठवले होते ते तुर्की या देशानेच दिले होते अर्थात भारताच्या भक्कम संरक्षण दलाने ते हवेतच भेदून टाकले. तुर्की या देशाने पाकिस्तानला मदत करताना थेट भारतावर टीका केली की भारतानेच पाकिस्तानवर हल्ला केला म्हणून त्यांनी पाकिस्तानला मदत केली. वास्तविक पाकिस्ताननेच दहशतवादी हल्ला घडवून आणला त्यामुळे पुढील संघर्ष निर्माण झाला हे संपूर्ण जग मान्य केले असताना तुर्की मात्र हे मान्य करायला तयार नाही याचा अर्थ पाकिस्तानने भारतात दहशतवादी कारवाया कराव्यात, आमच्या निष्पाप नागरिकांना मारावे आणि आम्ही ते निमूटपणे पाहत बसावे असे तूर्कीला सुचवायचे आहे का ? तुर्की प्रमाणेच अझरबैजान या देशाने ही पाकिस्तानला पाठिंबा देत भारतावर टीका केली. या दोन्ही देशांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला नाही मात्र भारतावर टीका करत पाकिस्तानला पाठिंबा दिला. या दोन्ही देशांचा हा कृतघ्नपणाच आहे. कारण या दोन्ही देशांना भारताने वेळोवेळी मदत केली आहे. या दोन्ही देशांना भारताने आपले मित्र राष्ट्र मानले आहे. या देशांनी मात्र भारताशी मैत्री निभावणे तर सोडाच पण भारताचा शत्रू असलेल्या पाकिस्तानला मदत करून भारताशीच शत्रुत्व पत्करले आहे. भविष्यात याचा त्यांना मोठा फटका बसणार हे निश्चित. २०२३ साली तुर्की आणि सीरिया या देशात मोठा भूकंप झाला होता. या भूकंपात तूर्कीची मोठी वित्त आणि जीवितहानी झाली होती. या भूकंपात तूर्कितील ५० हजारांहून अधिक नागरिक मरण पावले होते. तूर्किवर आलेल्या या नैसर्गिक संकटात भारताने आपली मैत्री निभावत तूर्किला अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू, औषधे यांचा पुरवठा केला. दुसऱ्या कुठल्या देशाच्या आधी भारताने या देशांना मानवी सहाय्य पुरवण्यासाठी धाव घेतली. त्यासाठी भारताने ऑपरेशन दोस्ती मोहीम राबवली. ऑपरेशन दोस्ती मोहिमेअंतर्गत भारताने तूर्कीला संकट काळात मदत केली त्यामुळे तेथील जनतेने भारताचे आभार मानले मात्र तेथील सरकारने काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला पाठींबा देत कृतघ्नपणा केला आणि आता युद्धात पाकिस्तानच्या बाजूने उभे राहून भारताशी शत्रुत्व पत्करले. दरवर्षी लाखो भारतीय तुर्कीला भेट देतात. त्यातून त्यांना वर्षाला तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. अझरबैजान या देशातही लाखो भारतीय पर्यटक भेट देतात. त्यांची अर्थव्यवस्थाही भारतीय पर्यटकांवर अवलंबून आहे. या दोन्ही देशातून भारतात व्यापार चालतो. तुर्की या देशातून मोठ्या प्रमाणात फळांची आयत होते. तुर्की या देशातून येणाऱ्या सफरचंदाला भारतात मोठी मागणी आहे. तुर्की आणि अझरबैजान या देशात चित्रपट निर्माते, दिग्दर्शक चित्रपटांचे, मालिकांचे आणि वेबसिरिजचे चित्रीकरण करतात त्यातूनही त्यांना मोठा महसूल मिळतो आता या दोन्ही देशांनी जो कृतघ्नपणा केला त्यामुळे या दोन्ही देशांविरुद्ध भारतात संतापाची लाट उसळली असून या दोन्ही देशांना धडा शिकवण्यासाठी बॉयकॉट तुर्की अँड अझरबैजान ही मोहीम भारतात राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत भारतातील नागरिक या दोन्ही देशांवर बहिष्कार टाकत आहेत. बॉलिवूडने तुर्की आणि अझरबैजान या दोन्ही देशात चित्रीकरण करण्यास नकार दिला असून या देशांवर बहिष्कार टाकला आहे. पर्यटक व्यावसायिकांनीही या दोन्ही देशातील आपले बुकिंग रद्द करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला आहे. व्यापाऱ्यांनीही तूर्कितून येणाऱ्या वस्तूंवर बहिष्कार टाकला आहे. भारताचे हे बहिष्कार अस्त्र या दोन्ही देशांच्या मुळावर येणार आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशांवर टाकलेल्या या बहिष्कार अस्त्राने या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था गोत्यात येऊ शकते. असंगाशी संग केल्याचा परिणाम या दोन्ही देशांना भविष्यात भोगावा लागणार आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**



**केंद्रीय मंत्री रामदास आठवले जालना येथे आले असता त्यांचे पुष्प गुच्छ द्वारे स्वागत करतांना ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, सिद्धार्थ चव्हाण पदाधिकारी कार्यकर्ते (छाया/जावेद तंबोली)**

## कु नक्षत्रा चेके चा एसएससी बोर्डात जिल्ह्यात चौथा क्रमांक

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सप्तशृंगी नगर अंबड रोड येथील रहिवासी व ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल ची विद्यार्थिनी कु नक्षत्रा विजय अन्नपूर्णा चेके दहावीच्या एसएससी बोर्ड च्या परीक्षेमध्ये ९७.४० मार्क मिळवून शाळेमध्ये सर्वप्रथम व जालना जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवून मोठे यश संपादन केले तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे.

# कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल घृणास्पद वक्तव्य करणाऱ्या विजय शाहवर देशद्रोहाचा खटला दाखल करावा


भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये घुसून केलेली आतंकवाद विरोधी कारवाईचे संपूर्ण भारत स्वागत करीत आहे तर दुसरीकडे संपूर्ण भारतीय सेनेच्या कारवाईचे संपूर्ण जग आश्चर्यचकित कौतुक करीत आहे.यामुळे अमेरिका, चीन, तुर्की हादरून गेला आहे. सोबतच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व रक्षा मंत्री राजनाथ सिंग भारतीय सेनेचे मनोबल वाढविण्यासाठी सीमावर्ती भागात थेट भेट देत आहेत. परंतु भारतातील निर्लज्ज नालायक मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शहा यांनी वादग्रस्त वक्तव्य करून निर्लज्जतेची हद्द पार केली आहे. देशातील सैनिक असो अथवा सैन्य अधिकारी हा देशाचा कणा आहे.शाहनी लक्षात ठेवले पाहिजे की शेतकरी हा अन्नदाता, कामगार हा शिल्पकार व भारतीय स्थल,जल व वायू सेना ही देशाचा कणा आहे.कारण सेना देशाच्या १४० कोटी जनतेसाठी तहानभूक,उन, पाऊस,वादळ विसरून २४ तास देशाच्या सिमेवर उभा राहुन देशाची सेवा करतो व आपली ढाल बनून रक्षण करतो.माझ्यामते विजय शहाचे घृणास्पद वक्तव्य सन्माननीय कर्नल सोफिया कुरैशी पुरते सिमीत नसुन संपूर्ण भारतीय सैन्यावर घनाघाती प्रहार आहे.त्यामुळे केंद्र सरकारने विजय शाह बद्दल कठोर निर्णय घेऊन आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावलीच पाहिजे.कारण त्यांचे हे घृणास्पद वक्तव्य देशाच्या १४० कोटी जनतेच्या हृदयात मोठी जखम करून बसली आहे.उच्चपदस्थ राजकीय पुढारी मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शाह एका जाहीर कार्यक्रमात म्हणाले की, ज्यांनी आपल्या मुलींचे कुंकू पुसले होते, त्या लोकांना आम्ही त्यांच्याच बहिणीला पाठवून चांगलाच धडा शिकवला. त्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले,तर मोदीजींनी त्यांच्याच समाजातील बहिणीला पाठवले की, जेणेकरून ज्यांनी आमच्या बहिणी विधवा केल्या त्यांना त्यांच्या समाजातील बहीण नग्न करून सोडल. अशाप्रटारचे बेताल वक्तव्य करून विजय शाहनी बेशरमीची हद्द पार केली. असे वक्तव्य करतांना शाहला थोडीशी तरी शर्म वाटायला पाहिजे की भारतातील हिंदू-मुसलमान एक आहे आणि अनंत काळापर्यंत एकत्र राहील हीच भारताची मोठी उपलब्धी आहे.त्यामुळे शाह सारख्या व्यक्तीला देशातील कोणत्याही संविधानिक पदावर रहाण्याचा अधिक नाही. आज विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे. कारण सरकारने जर विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई केली तर देशातील प्रत्येक तळागाळातील राजकीय पुढारी थोर पुरुषांबद्दल, स्वतंत्र सैनिकांबद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल बेजबाबदार वक्तव्य करतांना हजार वेळा विचार करेल. त्यामुळे आजच्या परिस्थितीत विजय शहा यांच्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे.कारण त्यांनी देशाच्या रक्षणकर्ता सैन्यावर व सैन्य शक्तीवर मोठा प्रहार करून ताशेरे ओढले आहेत ही बाब देशातील १४० कोटी जनता कदापि सहन करणार नाही. विजय शाहला कल्पना नसेल की की आज भारतात सर्वधर्मसमभाव असल्यामुळे भारत विश्व शांतीचा दुत बनला आहे ही बाब शाहने लक्षात ठेवली पाहिजे.आज भारतात हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध हे संपूर्ण एकोप्याने राहतात आणि जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी सर्वच धर्माचे, पंथाचे,जातीचे लोक एकोप्याने राहतात आणि सर्वच आपापल्या संस्कृतीचे पालन करतात.त्यामुळेच संपूर्ण जग भारताकडे चांगल्या दृष्टीने पहातात व विदेशातील लोक भारतात भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी येतात.परंतु विजय शाह सारख्या बेताल वक्तव्य करणाऱ्या नालायक लोकांना कोणत्याही राजकीय पक्षात किंवा कोणत्याही पदावर रहाण्याचा अजीबात अधिक नाही असे मला वाटते.२०१३ मध्ये शिवराजसिंह चौहान यांच्या पत्नी साधना यांच्याविषयी वादग्रस्त टिप्पणी केल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला होता.यावरून स्पष्ट होते की, विजय शाह यांनी निर्लज्जतेची संपूर्ण हद्दपार केली आहे.त्यामुळे त्यांच्यावर ताबडतोब देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे. सध्या देशात राजकीय पोळी शेकण्यासाठी राजकीय पुढारी विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यावर आवर घालण्यासाठी सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला होता की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी.त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.याच आधारे देशाचा, देशाच्या सैन्य शक्तीचा व १४० कोटी जनतेचा अपमान करणाऱ्या राक्षसाला कठोर शिक्षा झालीच पाहिजे.असे जर झाले तर विद्वेषी वक्तव्ये किंवा घृणास्पद किंवा वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्यांच्या जिभेवर आपोआप आवर बसेल.विजय शाह यांनी अशा वेळेस गलिच्छ भाषेत वक्तव्य केले आहे की,आपण आपल्या दुष्मन राष्ट्र पाकिस्तान विरूध्द चांगली लढत देत आहोत आणि त्याला धाराशाही करण्याचे काम कर्नल सोफिया कुरैशी व भारतीय सेनेने केले त्यांच्यापुढे संपूर्ण भारत नतमस्तक आहे. आता घृणास्पद वक्तव्य अंगलट आल्या बरोबर मध्यप्रदेशचे मंत्री विजय शाह म्हणतात की, माझ्या वक्तव्याने कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दहा वेळा माफी मागायला तयार आहे.कर्नल सोफिया कुरैशी यांच्या बद्दल मला बहिणीपेक्षा अधिक आदय वाटतो. शाहला आता येवढा आदर वाटत आहे तेव्हा बोलतांना थोडीशीही शरम का आली नाही?शाहला लाज वाटायला हवी की सोफिया कुरैशी ही प्रथम भारतीय महिला आहे आणि आता देशाची ढाल आहे.त्यामुळे विजय शाह सारख्या बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या गुन्हेगाराला माफी नकोच त्यावर एकच उपाय ती म्हणजे कठोर शिक्षा,असे जर झाले तर देशातील बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर आपोआप आवर बसेल यावर महामहीम राष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट,प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, उपराष्ट्रपती यांनी याबाबतीत गांभीर्याने दखल घ्यावी अशी मी या लेखाच्या माध्यमातून सन्माननीय मान्यवरांना विनंती करतो.कारण बेजबाबदार वक्तव्य करणारे राजकीय पुढारी देशासाठी घातक असतात कारण यामुळे समाजात विष पसरत असते असे मला वाटते. सन्माननीय कर्नल सोफिया कुरेशी व संपूर्ण सैन्य शक्तीला माझा कोटी-कोटी सलाम.जय हिंद, जय भारत.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# धाडसी नेतृत्व; गिरीश महाजन

कुठलही यशस्वी नेतृत्व मग ते राजकीय असो प्रशासकीय असो ते विकसित होतं त्याच्यामागे अनेक कारणे असतात. संस्कार असतात. शालेय आणि कौटुंबिक संस्कार असतात. आई-वडिलांचे संस्कार असतात. ते तर अतिशय महत्त्वाचे आहेत. ते संस्कार म्हणजे त्या व्यक्तीची ताकद असते आणि ही ताकद त्या व्यक्तीची जी निष्ठा असते ती कधीही कमी होऊ देत नाही. असंच एक कुशल यशस्वी नेतृत्व जामनेर तालुक्यात उदयास आले ते म्हणजे नामदार गिरीशभाऊ महाजन. माध्यमिक शिक्षक कै. दत्तात्रय भिका महाजन यांचे घरात त्यांचा जन्म झाला. सरांचे सर्वसामान्य



परिस्थितीतील, मध्यमवर्गीय कुटुंब. पत्नी, दोन मुली, एक मुलगा.

भाऊंचे वडील शिक्षक ,म्हणजेच शिक्षणाशी जवळचा संबंध आणि शिक्षण झाले ते न्यू इंग्लिश स्कूल जामनेर आणि याच ठिकाणी त्यांचे वडील दत्तात्रय भिका महाजन पर्यवेक्षक होते. आम्ही त्यांना डी.बी. महाजन सर असे म्हणत होतो.बी.एस.सी.( ॲग्री ).शेती हा मुख्य विषय. डी.बी. महाजन सरांची शिस्त खूप .शाळेमध्ये मुलांनी म्हणजेच विद्यार्थ्यांनी वेळेवर यावे आणि अभ्यासात मन रमवावे यावर ज्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे शाळा सकाळी सुरू होत असताना विद्यार्थ्यांनी वेळेवर येऊन प्रार्थनेला उपस्थित राहावे याकडे त्यांचे लक्ष असायचे आणि उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गेट बंद करून त्याला शिक्षा होत होती। ते स्वतः शाळेच्या गेटवर थांबत. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही एक प्रकारचा आदरयुक्त धाक होता. विद्यार्थी त्यामुळे वेळेवर येत असत. वर्ग सुरू असतानाही मुलै वर्गाच्या बाहेर फिरलेले त्यांना आवडत नव्हते. शिकवण्याचा तास सुरू असताना जर मुले बाहेर फिरत असतील तर त्याची विचारपूस करीत असत. असे म्हणता येईल की मुख्याध्यापकांपेक्षाही यांचा शिस्तीकडे कल होता. अर्थात तो विद्यार्थ्यांना हिताचा होता अशा शिस्तप्रिय शिक्षकांचा मुलगा म्हणजे आपले गिरीशभाऊ महाजन. अशा शिस्तीत वाढल्यानंतर घरी आईचे प्रेम आणि वडिलांची शिस्त अशा संस्कारात त्यांचे बालपण शिक्षणाचा काळ गेला.

घरी कुठलाही राजकीय वारसा नव्हता. राजकीय हितसंबंध नव्हते व तसे वातावरण नव्हते. तसेच सरांचाही राजकारणाशी आणि राजकारण्यांशी संबंध नव्हता.

गिरीशभाऊं मध्ये शाळा आणि महाविद्यालय जीवनापासूनच धाडस आणि नेतृत्व हे गुण होते. त्याला जोड मिळाली ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद. निमित्ताने विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणे संघ शाखेवर जाणे प्रार्थना म्हणणे , त्याचबरोबर राष्ट्रप्रेम वाढीस लागू लागले संघाचे शिस्तीचे वातावरण त्याला कारणीभूत ठरले आणि एकूणच हळूहळू संघटन कार्याकडे ओढ वाटू लागली त्यातूनच पुढे महाविद्यालयीन प्रतिनिधी,सरपंच, आमदार, मंत्री, असा यशस्वी राजकीय प्रवास सुरू आहे हे केवळ संघटन कौशल्य असल्यामुळे आणि जवळ असलेल्या संस्काराच्या शिदोरीवर. १९९२ मध्ये त्यांची जामनेर ग्रामपंचायत सरपंच पदी निवड झाली. पुढे पक्षाच्या संघटन कार्यात तालुका,जिल्हा, भाजपा अध्यक्ष, राज्य पातळी पक्ष संघटनाची,मंत्री पदाची जबाबदारी अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आणि अजूनही त्या पार पाडत आहेत.

तालुक्यातील मातब्बर आणि धनाढ्य व्यक्तीशी टक्कर देऊन १९९५ झाली ऐन तारुण्यात आमदार पदी निवडून आलेत. हे आयुष्यातील फार मोठे यश संपादन केले होते आणि ते केवळ आणि केवळ आई-वडिलांचे आशीर्वाद संस्काराची शिदोरी आणि सर्वसामान्य जनतेचे प्रेम आशीर्वाद होते. मग पुढे यशाची घोडदौड आज पर्यंत अशीच सुरू आहे. गिरीश भाऊंनी आपल्या आयुष्यात माणसं कमावलीत.केवळ पैसाच सर्वकाही नाही, जर जनतेचे प्रेमही हवे.

आता भाऊंची ही सातवी टर्म आमदारकीची सुरू आहे. या काळात दोनदा मंत्रिपद तेही महत्त्वाचे खाते मिळाले. जलसंपदा आणि उच्चशिक्षण, नंतरच्या काळात आता ग्राम विकास, पंचायत राज वैद्यकीय शिक्षण आणि क्रीडा युवक कल्याण, जलसंपदा,पुनर्वसन अशी खाते मिळाली. जळगाव, नासिक, नंदुरबार, धुळे, लातूर, नांदेड, अशा जिल्ह्याचे पालक मंत्रीपद मिळाले. पण त्या जिल्ह्याचे पालकमंत्री असूनही आपल्या तालुक्याकडे आपल्या जिल्ह्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले नाही. आणि आपल्याकडे जे मंत्रीपद आहे ते संपूर्ण राज्याचे आहे याचा विचार करून प्रत्येक वेळेला राज्यासाठी काय महत्त्वाचे आहे हा विचार सतत केला आणि करत आहे. आपल्या कारकीर्दीत व्यक्तिगत विकास फायद्याला महत्त्व न देता सामुहिक दृष्ट्या फायद्याचे असेल त्याचा विचार ते अधिक करतात. त्या दृष्टीने गावाचा विकास जलसिंचनाच्या योजना तसेच शेतकऱ्यांसाठी जे जे करता येईल ते युवक वर्गासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी ज्या काही सुविधा मिळवता येतील तो मिळवण्याचा प्रयत्न ते सतत करीत असतात.

आरोग्य सेवेच्या बाबतीत तर त्यांचा आरोग्यदूत म्हणूनच उल्लेख होतो, निरनिराळ्यावेळी निरनिराळ्या ठिकाणी त्यांनी आरोग्य शिबिरे भरवली आणि सर्वसामान्य जनतेला त्याचा लाभ खूप मोठ्या प्रमाणावर मिळवून दिला. आवश्यकतेप्रमाणे मुंबई पुणे या ठिकाणच्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सोय केली. महाराष्ट्रातून बाहेरून वेळोवेळी तज्ञ डॉक्टरांचे टीम बोलवून उपचार केले. व खर्चही केला.

सामाजिक संबंध यालाही ते खूप महत्त्व देतात. तालुका, जिल्ह्याच्या, ठिकाणी सुखदुःखाचे प्रसंगी त्यांचा सहभाग असतो. सुखदुःखाचे प्रसंगी ते आवर्जून अशा ठिकाणी भेटी देत असतात.त्यांच्या अनुपस्थितीत सौ.साधना वहिनी ती जबाबदारी पार पाडतात.

अनेक वेळा आपण वृत्तपत्रातून वाचले असेल, अपघाताचे ठिकाणी पोहोचून जी काही तातडीची मदत करता येईल तिथे करत आले आहेत, तसेच शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी ते तत्पर असतात.

सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असतो रामनवमी, गुढीपाडवा, दसरा, या वेळी होणाऱ्या कार्यक्रमात ते सहभागी असतात. धार्मिक कार्यक्रमातही सहभाग असतो. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निघणाऱ्या संचालनातही ते अग्रभागी असतात. निरनिराळ्या समाजाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन ते जातीय सलोखा राखतात. कार्यकर्त्यात उत्साह निर्माण करतात. मिरवणुकामध्ये आपण त्यांना लेझीम खेळताना बघितले असेल.

युवा अवस्थेपासूनच त्यांना व्यायामाची आवड, कुस्तीची आवड त्यामुळे सोबत रोजचा व्यायाम, त्यामुळे कधीही आळस म्हणून नाही, सकाळी कार्यकर्त्यांच्या भेटीला किंवा नियोजित ठिकाणी जाण्यासाठी तयार असतात. हॉर्स रायडींग, शूटिंग बॉल, हॉलीबॉल, कबड्डी, अशा विविध खेळांची त्यांना आवड. तसेच अशा विविध खेळांच्या संघटनांचे ते पदाधिकारी आहेत आणि ह्या सर्वच गोष्टीने संस्काराने निर्व्यसनी आणि शुद्ध शाकाहारी आहेत. खरोखर असा निर्व्यसनी नेता क्वचित सापडेल असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

आपल्या कार्यामुळे , कुशलतेने व धाडसामुळे ते अधिक लोकप्रिय झाले आहेत. कुठल्याही अडचणीच्या प्रसंगी धावून जातात त्यामुळे त्यांना संकट मोचक म्हणतात जसे राज्यात ते लोकप्रिय आहेत तसेच माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी तसेच गृहमंत्री अमितजी शहा,यांनाही प्रिय आहेत. मुख्यमंत्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे मित्रत्वाचे संबंध आहे. तसे तर त्यांचे संपूर्ण मंत्रिमंडळाशी मित्रत्वाचे संबंध आहेत. मैत्रीच्या ठिकाणी मैत्री आणि राजकारणाच्या ठिकाणी राजकारण असे त्यांचे तत्व आहे. आपल्या तत्त्वाला मात्र ते कधी सोडत नाही.

अनेक वर्ष पक्षात राहून फायदा घेऊन आपल्या मनाप्रमाणे पक्षात स्थान मिळत नाही म्हणून पक्ष सोडणारे मंडळी आपण बघितले आहे किंवा बघत आहोत. परंतु शेवटी जी संस्कारांची शिदोरी असते ती नेहमीच बरोबर असल्यामुळे गिरीशभाऊ मात्र त्यांच्यापेक्षा खूप वेगळे आहेत हे जाणवते आणि हे आपण सर्वजण मान्य कराल.


बालपणापासून शाळा कॉलेज सरपंच आमदार मंत्री असा प्रवास करताना आजही ते लहानपणी ज्या घरात राहत होते त्याच घरात राहत आहेत. गिरीशभाऊंना भेटायला जायचे म्हणजे फार दिव्य पार पाडावे लागत नाही. सर्व सामान्यांचे आमदार, नेते, मंत्री, म्हणूनच ते प्रसिद्ध आहेत. आणि अगदी सर्वसामान्य कार्यकर्त्याला ते सहज उपलब्ध होतात आणि त्याच्या अडचणी दूर करण्यास मदत करतात हा. असा त्यांचा महत्त्वाचा गुण आहे. प्रत्येकाला ते आपलेच वाटतात. काही वेळेस तर पानटपरी वरील आमदार म्हणून त्यांना हिणवले गेले. पण अशांची काय परिस्थिती आहे, आपण बघतोय.. पानटपरी वरचा हा आमदार. मंत्री. सर्वसामान्यांचे गळ्यातील ताईत बनलाय.

गावातलं घर सोडून मोठ्या बंगल्यात राहायला जाण्याचा विचार त्यांच्या मनात कधी आला नाही. ज्या घरात बालपण घालवले आई वडिलांचे संस्कार झालेत असे हे संस्काराची शिदोरी असलेले घर त्यांना सोडावे वाटत नाही. ती कायम त्यांच्यासोबत आहे आणि राहील.

भाऊंच्या दोन्ही मुलींची लग्न झाली आहेत. सौ.साधना वहिनी नगरपरिषद कारभार समर्थपणे बघत होत्या. भाऊ आणि वहिनींनी जनसेवेला वाहून घेतलयं.

संस्कारांच्या शिदोरीवरच त्यांची वाटचाल यशस्वी पणे सुरू आहे.ती अशीच चालत राहो. आजही आपली गाडी थांबवून सर्वसामान्यांशी बोलणारे भाऊ मंत्री आहेत. मी जोआहे तो केवळ माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या जनतेमुळे हीच भावना त्यांची आहे.

नुकतेच पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेले हल्ल्यात अनेकांचा मृत्यू झाला. अशी दुःख घटना घडलीअसताना माझ्या वर प्रेम करणाऱ्यांनी हार गुच्छ तसेच मोठे मोठे बॅनर न लावता त्या ऐवजी ती रक्कम पंतप्रधान निधीसाठी द्यावी. त्यातच मला समाधान आहे. रक्तदान शिबिर आरोग्य शिबिर आयोजित करावे. कोणीही गुच्छ, हार तुरे याच्यावर खर्च करू नये अशी विनंती त्यांनी जनतेला आणि कार्यकर्त्यांना केली आहे.



**दिलीप देशपांडे,**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा. ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

## विवेकानंद इंग्लिश शाळेच १० वी बोर्ड परीक्षेत अभूतपूर्व यश




**परतूर । प्रतिनिधी -** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ यावर्षी घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर च्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश प्राप्त केले आहे.

ऋतुराज कदम याने ९९.२०%,आदित्य सोनखेडकर ९८.८०%, शिवेश गवंडरे ९८.२०%, अथर्व मुंदडा ९७.४०%, विश्वजीत गुंजकर ९७%, प्रद्युम्न जोगदंड ९६.२०%, अनुराधा काळे ९५.८०%, धनश्री गिरी ९५.८०%, पृथ्वीराज सोळंके ९५.६०%, आदिती अंभोरे ९५.४०%, प्रतीक गायकवाड ९४.८०%, कौस्तुभ काकडे ९४.४०%, रिया चव्हाण ९४%, आदित्य राठोड ९३.८०%, सोनल अंभुरे ९३.६०%, स्वराज राजमाने ९३.६०%, लक्ष्मीकांत मुळे ९३.४०%, प्रद्युम्न झाडे ९३.४०%, केदार अंभुरे ९३%, तनुष्का सोळंके ९२.८०%, वैभव भोसले ९२.४०%, वेदिका निर्वाळ ९१.६०%, गौरी अग्रवाल ९०.८०%, ईश्वरी टेकाळे ९०.४० मिलवुन यश मिळवले.

ऋतुराज कदम याने आय टी आणि गणित विषयात १०० पैकी १०० गुण, आदित्य सोनखेडकर याने इंग्रजी आणि आय टी विषयात १०० पैकी १०० गुण, अथर्व मुंदडा आय टी विषयात १०० पैकी १०० गुण, पृथ्वीराज सोळंके याने म राठी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले.

१० विद्यार्थी ९५% पेक्षा जास्त गुण मिळवले तर २४ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवुन उत्तीर्ण झाले आहेत.

या यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे विवेकानंद सेवा केंद्राचे अध्यक्ष डॉ शेषरावजी बाहेकर, संचालक संदीप बाहेकर, विवेकानंद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिंदे, प्राचार्य भालचंद्र महाजन, विजयकुमार दंदाले, रश्मी यादव व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

### 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'

## सनातन राष्ट्राचा जयघोष करत हिंदुत्वनिष्ठ गोव्याकडे रवाना!



**छत्रपती संभाजीनगर । जालना । प्रतिनिधी** - मानवजातीच्या परम कल्याणासाठी, तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फोंडा-गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होत आहे. या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातून सनातन संस्थेचे साधक, हिंदू धर्मप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांनी 'सनातन राष्ट्रा'चा जयघोष करत असे एकूण २५० हून अधिक जणांनी बस मधून, रेल्वेने व तसेच विमानाने गोव्याकडे प्रयाण केले.

### दिव्या सुळसुळेचे यश

**जालना । प्रतिनिधी -** येथील गुजराती हिंदी विद्यालयाची विद्यार्थिनी दिव्या कैलास सुळसुळे हिला दहावीच्या परीक्षेत ८७.२० टक्के घेवून घवघवीत यश प्राप्त केले आहे. यासाठी प्रदिप तौर सर यांचे मार्गदर्शन लाभले असून वडिल कैलास सुळसुळे, आई शीला कैलास सुळसुळे आणि मित्र परिवार यांच्या वतीने अभिनंदन होत आहे.

## 'शहरांचा शाश्वत विकास' या विषयावर जालना क्रेडाईतर्फे रविवारी व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी -** जालना क्रेडाईच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यानिमित्त रविवार, दि. १८ मे रोजी सायंकाळी ७ वाजता हॉटेल गॅलेक्सीमध्ये शहरांचा शाश्वत विकास या विषयावर महाराष्ट्र राज्याच्या नगर रचना विभागाच्या संचालिका श्रीमती प्रतिभा भदाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास महाराष्ट्र क्रेडाईचे अध्यक्ष प्रफुल्ल तावरे, उपाध्यक्ष सुनील कोतवाल आणि सहसचिव गंगाप्रसादजी तोष्णीवाल हेदेखील उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. वाढते औद्योगिकीकरण, रोजगाराच्या संधी व स्थलांतराच्या वाढत्या प्रवाहामुळे ग्रामीण भाग शहरात परिवर्तित होत आहेत. त्यामुळे वाहतूक, पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता, मलनिस्सारण, पार्किंग, ट्राफिक व पर्यावरण या विषयांवरील समस्या गंभीर होत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शहरांचा शाश्वत विकास म्हणजेच दीर्घकालीन व समतोल दृष्टीकोनातून होणारी वाढ ही काळाची गरज बनली आहे. महाराष्ट्र शासनाने शाश्वत शहरीकरणासाठी गृहनिर्माण धोरण तयार केले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. शाश्वत विकास म्हणजे काय, तो कसा साध्य करता येईल, शासनाचे याम ागचे धोरण व दृष्टिकोन काय आहे, या सर्व मुद्यांवर श्रीमती भदाणे ह्या प्रदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमाला विकासप्रिय नागरिक, उद्योगपती, बांधकाम व्यावसायिक, व्यापारी, चार्टर्ड अकाउंटंट, डॉक्टर्स, वकील आणि सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन क्रेडाईच्यावतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

### भाजपाच्यावतीने ...

दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी एक कठोर निर्णय घेतला. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आणि आमच्या सैन्याने पाकव्याप्त प्रदेशातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला केला आणि त्यांना पूर्णपणे नष्ट केले. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून यशस्वी 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारतीय सशस्त्र दलांच्या धैर्य आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी 'तिरंगा यात्रा' आयोजित केली आहे.

या तिरंगा रॅली पदयात्रेस सर्व देशप्रेमी, नागरिकांनी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी केले.

### वाहनफेरी म्हणजे ...

शंखनाद'! ही फेरी म्हणजे सनातन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी हिंदु राष्ट्राच्या दिशेने उचललेले पुढचे पाऊल होय!

सनातन संस्थेच्या फोंडा येथील सनातन आश्रमाजवळ म ाजी भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी (IS) श्री. अरुण देसाई यांच्या हस्ते धर्मध्वज पूजन केल्यानंतर वाहनफेरीला प्रारंभ झाला. ही वाहनफेरी पुढे कवळे -तिस्क फोंडा, शांतीनगर जंक्शन, गोवा बागायतदार, फोंडा पोस्ट ऑफीस कार्यलय-फोंडा येथील जुने बसस्थानक-श्री हनुमान मंदिर, कुर्टी-फर्मागुडी येथील किल्ल्याजवळ सांगता झाली. यापूर्वी विविध ठिकाणी सुहासिनींनी धर्मध्वजाची ओवाळणी करून आणि रस्त्यावर रांगोळी घालून फेरीचे स्वागत केले. या वेळी विविध संघटना सहभागी झाल्या होत्या.

**वाहनफेरी म्हणजे भक्तीची दिव्य वारी !**

वाहन फेरीच्या प्रारंभी सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक म्हणाले, ''ज्याप्रकारे आषाढी वारीसाठी लाखो वारकरी विठ्ठलाच्या भेटीच्या ओढीने पंढरपूरकडे प्रयाण करतात. त्याचप्रकारे सनातन धर्मासाठी विश्वव्यापक कार्य करणारे सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवासाठी देशविदेशातून हजारो साधक आणि धर्मप्रेमी हिंदू विविध मार्गाने आज गोव्यातील पंढरीत प्रवेश केला. ही केवळ वाहन फेरी नसून श्रीगुरुदेवांप्रती असलेल्या भक्तीची दिव्य वारी आहे. पत्रकार, पोलीस आदींनी दिलेल्या माहितीनुसार गोव्यातील आतापर्यंतचा हा सर्वाधिक मोठा महोत्सव आहे.'' या महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी, तसेच थेट प्रक्षेपण पहाण्यासाठी Sanatanrash trashankhnad.in या संकेतस्थळाला भेट द्या !

### अवकाळी पाऊस ...

करावी. तसेच जिल्ह्यात बालस्नेही पोलीस स्टेशन सुरु करवायचे असल्यास त्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना ही यावेळी उपसभापती श्रीमती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिल्या.

मागील काही दिवसात राज्यातील विविध भागात अवकाळी पाऊस झाला असून, जालना जिल्ह्यात देखील अवकाळी पावसाम ुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने सर्व नुकसानींचे तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत मिळेल यासाठी प्रयत्न करावे. तसेच पावसाळ्यात वीज पडून अनेक नागरिकांचा मृत्यू होतो. याकरीता जिल्ह्यात महत्वाच्या ठिकाणांवर वीज नियंत्रक उभारण्याचे निर्देश श्रीमती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिले. जालना जिल्ह्यातील पाणी टंचाईचा आढावा घेतांना श्रीमती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, पिण्याच्या पाण्याची समस्या मोठी असून, नागरिकांची मागणी येताच पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी तात्काळ योग्य नियोजन व उपाय योजना करण्याचे निर्देश ही उपसभापती श्रीमती डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्र. पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि महिला बालविकास अधिकारी कोमल कोरे यांनी सादरीकरणांद्वारे माहिती सादर केली. बैठकीस सर्व संबंधित विभागांचे अधिकारी आणि इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

## प्रत्येकात एक वेगळेच टॅलेंट आहे

जगी सर्वगुणसंपन्न असा कोण आहे?
प्रत्येकात कोणते ना कोणते
तरी एक वेगळेच टॅलेंट आहे
कोणी अभ्यासात हुशार तर
कोणी व्यवहारात हुशार आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे
कोणी लिहिण्यात पटाईत तर
कोणी बोलण्यात पटाईत आहे
कोणी राजकारणात हुशार तर
कोणी समाजकारणात हुशार आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे
कोणी छान कविता रचत आहे
तर कोणी छान गझल लिहित आहे
कोणी छान गायन करत आहे
तर कोणी छान भजन म्हणत आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे
कोणी शेती व्यवसायात हुशार आहे
तर कोणी उद्योग धंद्यात हुशार आहे
कोणी छान क्रिकेट खेळत आहे
तर कोणी जबरदस्त कबड्डी खेळत आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे
कोणी गणित विषयात पारंगत आहे
तर कोणी इंग्रजी विषयात तरबेज आहे
कोणी मराठी विषयात माहीर आहे
तर कोणी हिंदी विषयात कुशल आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे
कोणी छान पैकी ड्रायव्हिंग करत आहे
तर कोणी छान पैकी यंत्र चालवत आहे
कोणी उत्कृष्टपणे अध्यापन करत आहे
तर कोणी चांगले सूत्रसंचालन करत आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे
कोणी राजकीय डावपेच आखण्यात हुशार आहे
तर कोणी नियोजनबद्ध काम करण्यात परफेक्ट आहे
कोणाला चांगल्या पैकी युद्धतंत्र अवगत आहे
तर कोणाला बऱ्यापैकी कायद्याचे नॉलेज आहे
प्रत्येकात कोणते ना कोणते तरी टॅलेंट आहे.

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# पालकांनो मुलांचा बौद्धिक कल ओळखा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेचा ऑनलाइन निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या निकालात बहुतांश विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. आता पुढील शिक्षणासाठी हे विद्यार्थी सज्ज झाले आहेत. त्यासाठी बऱ्याच विद्यार्थ्यांपुढे आपण कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा? हा प्रश्न नक्कीच उभा राहिला असेल. कारण प्रत्येक विद्यार्थ्याला आपला शैक्षणिक कल व आपली आवड, कोणत्या शाखेकडे आहे? हे त्यांना अगोदरच माहीत असते. म्हणून दहावी व बारावीनंतर आपण कोणते शैक्षणिक क्षेत्र निवडावे हे विद्यार्थ्यांनी अगोदरच निश्चित करून ठेवलेले असते. काही विद्यार्थी आपला बौद्धिक कल ओळखून आपापल्या आवडीनुसार शैक्षणिक क्षेत्र निवडतात. पण काही विद्यार्थ्यांना आपला शैक्षणिक कल कोणत्या क्षेत्रात आहे, हे माहीत असूनही, केवळ आई-वडिलांच्या दबावामुळे व सक्तीमुळे त्यांना नको ते क्षेत्र निवडावे लागते. नंतर विद्यार्थ्यांना त्या शैक्षणिक क्षेत्राची आवड नसल्यामुळे त्यांना अभ्यास रटाळ, किचकट व समजायला थोडा अवघड जातो. त्यामुळे विद्यार्थी पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलण्यात पूर्णपणे अपयशी ठरतात. एकतर विद्यार्थी अगोदरच आई-वडिलांच्या दबावामुळे नको ते क्षेत्र निवडल्यामुळे नाराज झालेले असतात आणि त्यातच विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रात अपयश आल्यामुळे विद्यार्थी अधिकच नाराज होतात. त्यांना वाटते की, आपण आई-वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडलो आहोत. आपण आई-वडिलांची इच्छा पूर्ण करू शकलो नाही. आता आपल्याला आई वडील काय म्हणतील? गावकरी व समाज बांधव काय म्हणतील? या विचारांनी ते भयभीत होतात. आतून पूर्णपणे खचून जातात. आणि स्वतः ला नैराश्याच्या खाईत लोटतात. आई वडीलही त्यांना खूप रागावतात, गावातील मित्रमंडळी त्यांना चिडवते व टोमणे मारून हिनवते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा तणाव अधिकच वाढतो. आणि त्यांच्या डोक्यात सारखे आत्महत्येचे विचार रुंजी घालू लागतात. आणि त्यांना जीवन जगण्यात निरर्थकता वाटू लागते. म्हणून ते स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करतात. आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलून एकदिवस स्वतःचे जीवन संपवतात. अशा धक्कादायक घटना आपण दररोज वर्तमानपत्रात वाचत आहोत. सोशल मीडियावर व टीव्हीवर पाहत आहोत. अशा घटना घडण्यामागे त्या विद्यार्थ्यांचे आई वडील कारणीभूत आहेत, असेच म्हणावे लागेल. कारण बहुतांश मुलांचे आई वडील आपल्या मुलांची बौद्धिक आवड व कल कोणत्या क्षेत्राकडे आहे, हे न बघता आपल्या मुलांना वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रात शिक्षण घेण्यास प्रवृत्त करतात. परंतु मुलांचा बौद्धिक कल हा वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्राकडे नसून तो कला किंवा वाणिज्य शाखेकडे असू शकतो. म्हणून त्यांना या क्षेत्रात अपयश येते. जर प्रत्येक आई-वडिलांना आपल्या मुलांनी भविष्यात घवघवीत व उज्वल यश संपादन करावे, असे वाटत असेल तर आपल्या मुलांवर कोणत्याच अपेक्षांचे ओझे न लादता, त्यांच्यावर कोणतीच जबरदस्ती न करता, आपल्या मुलांचा बौद्धिक कल व शैक्षणिक आवड कोणत्या क्षेत्रात आहे, हे लक्षात घेऊन त्यांना त्या क्षेत्रात त्यांच्या मनाप्रमाणे शिक्षण घेण्यास प्रवृत्त करावे. म्हणजे ते त्या क्षेत्रात नक्कीच यशाला गवसणी घातल्याशिवाय राहणार नाहीत. आजपर्यंत ज्या ज्या व्यक्ती यशोशिखरावर विराजमान झाल्या, त्या व्यक्तींनी अगोदर आपला शैक्षणिक कल व आवड लक्षात घेऊन त्यानुसार शिक्षण घेतले, म्हणून ते यशाचे शिखर पादाक्रांत करू शकले. परंतु खेदाची बाब अशी की, आपल्या भारत देशात बहुतांश पालकांचा ओढा हा वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्राकडे असल्याचे दिसून येत आहे. म्हणून प्रत्येक आईवडील आपल्या मुलाला किंवा मुलीला मेडिकल किंवा इंजीनियरिंग या क्षेत्रात शिक्षण घेण्याची जबरदस्ती करत आहेत. पण मुलांचा बौद्धिक कल हा वेगळ्याच क्षेत्राकडे असतो. ज्या मुलांचा कल कला किंवा वाणिज्य क्षेत्राकडे असतो, त्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शिक्षण दिल्यास ते विद्यार्थी कसे काय यशस्वी होतील? हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांचा ओढा हा आपापल्या बौद्धिक कलानुसार वेगवेगळ्या क्षेत्राकडे असू शकतो. काही मुलांचा ओढा वैद्यकीय क्षेत्राकडे असू शकतो, काही मुलांचा ओढा अभियांत्रिकी क्षेत्राकडे असू शकतो, काही मुलांचा ओढा हा वाणिज्य क्षेत्राकडे असू शकतो तर काही मुलांचा ओढा हा कला क्षेत्राकडे असू शकतो. पण आजकाल असे झाले आहे की, प्रत्येक आई-वडिलांना आपला मुलगा डॉक्टर किंवा अभियंता व्हावा असे वाटत आहे. त्यामुळे कोणत्याच आई-वडिलांना आपल्या मुलाने कला किंवा वाणिज्य शाखेला प्रवेश घ्यावा असे वाटत नाही. तर त्यांना वाटते की, आपल्या मुलाने डॉक्टर किंवा अभियंता व्हावे, याचा अर्थ असा की, आजकालच्या पालकांचा असा गैरसमज झालेला आहे की, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी या दोन क्षेत्रांमध्ये जास्त पैसा व प्रतिष्ठा आहे. इतर क्षेत्रांत म्हणावा तेवढा पैसा व प्रतिष्ठा नाही. म्हणून बहुतांश पालक आपल्या मुलांना डॉक्टर किंवा अभियंता होण्याचा तगादा लावतात. पण मुलांचा बौद्धिक कल काही वेगळाच असल्याम ुळे, विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रात यशाला मुकावे लागते. म्हणून सध्या विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण खूप वाढले आहे. याचा विचार प्रत्येक पालकांनी करणे गरजेचे आहे. याचा परिणाम आपल्या देशाच्या विकासावर सुध्दा होत आहे. कारण हे आजचे विद्यार्थी उद्याच्या देशाचे शिल्पकार असतात. पण हेच विद्यार्थी जर योग्य दिशेने वाटचाल करायचे सोडून, नको त्या क्षेत्रात, केवळ आई-वडिलांच्या जबरदस्तीमुळे भरकटत जात असतील तर त्या मुलांचे उद्याचे भवितव्य विनाशाच्या उंबरठ्यावर असेल, हे कोणालाही मान्य करावेच लागेल. अमेरिका, चीन व जपान या प्रगतिशील देशांमध्ये आजही मुलगा पाच वर्षाचा झाला की, त्या मुलाच्या मेंदूची तपासणी करून त्या मुलांचा बौद्धिक कल लक्षात घेतला जातो, आणि त्यानुसार त्याला योग्य ते शिक्षण देऊन त्या क्षेत्रामध्ये सक्षम केले जाते. मग ती मुले त्या क्षेत्रामध्ये नक्कीच यशाचा झेंडा रोवल्याशिवाय राहत नाहीत. म्हणूनच अमेरिका, जपान व चीन हे तिन्ही देश आज जगाची महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. पण खेदाची बाब अशी की, आपला भारत देश जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असूनही इतर देशांच्या तुलनेत मागे पडत आहे. याचा अर्थ असा की, आपल्या देशात आजही विद्यार्थ्यांचा बौद्धिक कल लक्षात न घेता, त्यांना मनमानी व सक्तीचे शिक्षण देऊन त्यांच्या यशाच्या योग्य वाटा बंद केल्या जात आहेत. आणि त्यांना अयोग्य दिशेने वाटचाल करण्याची सक्ती केली जात आहे. म्हणून बहुतांश विद्यार्थी जीवनात अपयशी ठरत आहेत. आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. आणि याला सर्वस्वी जबाबदार त्या मुलांचे आई-वडील ठरत आहेत. असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. म्हणून जाता जाता समस्त पालकांना माझी कळकळीची नम्र विनंती आहे की, पालकांनो जर तुम्हाला खरंच आपला मुलगा जीवनात यशस्वी व्हावा असे वाटत असेल आणि त्याने कोणत्यातरी क्षेत्रात आपला व आपल्या गावाचा नावलौकिक करावा असे वाटत असेल तर सर्वप्रथम आपण आपल्या मुलांचा बौद्धिक कल कोणत्या क्षेत्राकडे आहे, हे ओळखून त्यानुसार त्याला शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे, म्हणजे त्याला शिक्षण घेण्यास सोपे जाईल व त्याची जिज्ञासा आणखीन वाढेल... त्यासाठी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचा बौद्धिक कल ओळखून त्याला योग्य ते शिक्षण देणे काळाची गरज आहे, असे मला वाटते.



**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मो.७४९८७१५६६१**

# दहावीच्या परीक्षेत अजिंक्य यशवंत शेजुळ याचे यश



**परतुर । प्रतिनिधी -** इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९५.२०% गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अजिंक्य यशवंत शेजुळ परतुर योगानंद माध्यमिक विद्यालय परतुर येथील विद्यार्थी आहे. अजिंक्य यशवंत शेजुळ त्यीच्या यशाचे श्रेय हे तेच्या आई, वडील व योगानंद माध्यमिक विद्यालय परतुर येथील शिक्षकांना दिले आहे. अजिंक्य यशवंत शेजुळ यांना मराठी,९६ इंग्रजी,९४ गणित,८० विज्ञान आणि तंत्रज्ञान, ९२ सामाजिक शास्त्रे,९७ टक्केवारीः ९५.२०% मिळविली आहे. या यशाबद्दल परतुर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष श्यामसुंदर चितोडा,अजित दादा पवार गटाचे तालुका अध्यक्ष, जगताप वकील महासंघाचे अध्यक्ष,महेंद्र वेडेकर, सन ऑफ द आंबेडकर ग्रुपचे अध्यक्ष, सनी गायकवाड. परतुर पत्रकार संघाचे सचिव प्रभाकर प्रधान. पत्रकार हनुमंत दवडे. माणिक जैस्वाल. अशोक जी ठोके. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष,गणेश लालझरे. इमरान कुरेशी. राज भदर्गे.इंद्रजीत हिवाळे. रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष, जयपाल भालके, व रिपब्लिकन सेनेचे युवा तालुका अध्यक्ष,यांच्यासह अनेक मान्यवरांनी कौतुक केले आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देउन अभिनंदन करण्यात आले.

# काद्राबाद परिसरात पाणी वेळेवर सोडवा नसता शिवसेनेचा आंदोलनाचा ईशारा

## महापालिकेला शहर शिवसेनेचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील काद्राबाद परिसरात २० ते २२ दिवस महानगर पालिकेकडून पाणी पुरवठा करण्यात येत नसल्याने येथील रहिवाशांना विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. त्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे काद्राबाद परिसराला वेळेवर पाणी सोडण्यात यावा नसता शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांच्या म ार्गदर्शनाखाली उग्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना शहरप्रमुख दुर्गे श काठोठीवाले यांनी निवेदनाव्दारे महापालिकेच्या सहआयुक्त यांना देण्यात आला आहे. आज शहर शिवसेनेचे शिष्टमंडळाने म हापालिकेच्या आयुक्ताची भेट घेवून निवेदन दिले.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार,शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले आदींच्या शिष्टमंडळाने महापालिकेच्या प्रशासनातील अधिकार्यांची भेट घेवून पाण्यासंदर्भात जाब विचारला. तसेच जालना शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेला काद्राबाद विभागाला गेल्या २० ते २२ दिवसांपासून नळाला पाणी येत नाही. कर्मचारी व अधिकार्यांना वारंवार संपर्क करुनही नळाला पाणी येत नाही. नळाला जर पाणी आले तर दुषित पाणी येते नाही. त्याम ुळे रोगराईची भिती निर्माण झाले आहे. तसेच वेळेवर पाणी येत नसल्याने याचा सामान्य जनतेला यांचा त्रास होत असून गरीब व होतकरु लोकांना पाणी विकत घ्यावे लागत आहे. तरी वर्षाला २ हजार ७०० रुपये पाणी पट्टी करुन ही पाणी वेळेवर सोडले जात नाही. तरी पाणी पुरवठा अधिकारी यांनी काद्राबाद विभागाला पाणी सोडण्याचे आदेश द्यावे नसता शिवसेना स्टाईलने उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाव्दारे दिला आहे.

या निवेदनावर शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गे श काठोठीवाले, शांतीलाल गादिया, कमलाबाई संडूपटला, बजरंग राजपुत, पंडीत खैरे, आकाश गादिया, मंदाताई मि साळ, सोपान दुसाने, माधवी गुप्ता, सिंधूताई चव्हाण, शोभा मिटकर, प्रकाश पवार, रवि नवघरे, सुनिल नंद, नारायण मालोदे, मयुर धोत्रे, अभिमन्यु काठोठीवाले, तुषार मेघवाले, रवि नेवासेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### नसता रस्त्यावर उतरु - काठोठीवाले

काद्राबाद परिसरात पाणी सोडवावा अशी मागणी वारंवार महापालिकेच्या अधिकार्यांकडे करण्यात येते. परंतु अधिकारी व कर्मचार्यांना धाक नसल्याने ते पाणी सोडण्यास टाळाळाळ करतात. या प्रकारला धडा शिकविण्यासाठी शिवसेना स्टाईलने आंदोलन करुन रस्त्यावर उतरु, असा इशाराही शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी दिला आहे. तर महापालिकेचे सहायक आयुक्त यांनी तात्काळ पाणी सोडण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.